

# सव्यसाची साहित्यिक बा. द. सातोस्कर

- डॉ. सोमनाथ कोमरपंत
रायबंदर-गोवा.

**गो**मंतकातील सव्यसाची आणि तपस्वी साहित्यिक बा. द. सातोस्कर यांची यंदा जन्मशताब्दी. वाङ्मयनिर्मिती हाच त्यांचा श्वास आणि ध्यास होतात. जाज्वल्य मनोवृत्तीने आणि असीम निष्ठेने त्यांनी शारदेची अखंडित उपासना केली. त्यांनी कथा, कादंबरी, ललित निबंध, स्थलवर्णने, व्यक्तीचित्रे, बालसाहित्य आणि आत्मचरित्र हे वाङ्मयप्रकार यशस्वीरित्या हाताळले. संशोधनपर आणि समिक्षात्मक लेखन केले. पत्रविद्या व ग्रंथालयशास्त्र या विषयांवरची पुस्तके लिहिली. अनुवादाच्या क्षेत्रात कौशल्य प्रकट केले. या साऱ्या अथक प्रयत्नांमागे वाङ्मयाचा निदिध्यास ही एकमेव प्रेरणा होती. त्याला अभ्यासाची जोड मिळाली. खडतर साधनेतून त्यांनी विपुल व बहुमोल ग्रंथनिर्मिती केली. वाङ्मयीन नियतकालीकांचे

संपादन केले. 'गोमंतक' चे पहिले संपादक या नात्याने मुक्त गोमंतकात मराठी पत्रकारितेचा पाया घातला.

याशिवाय ग्रंथप्रसाराचे कार्य निरलसपणे केले. गोवा मुक्तीसंग्रामाशी ते निगडीत राहिले. 'दूधसागर' या नियतकालिकाद्वारे त्यांनी निर्माण केलेले जागृतीपर्व या संदर्भात अधोरेखीत करायला हवे. मुंबईत वास्तव्य असताना तेथील सामाजिक, शैक्षणिक, वाङ्मयीन आणि सांस्कृतिक संस्थांच्या कार्यात त्यांनी मन:पूर्वक भाग घेतला. ते गोव्यात परतल्यावर पुन्हा कार्यरत झाले. गोमंतकाच्या नवनिर्माणप्रक्रियेत दादासाहेबांचा मौलिक वाटा आहे.त्यांच्या परिणत वयातील अनुभव संचितांचा लाभ येथील जनतेस पुरेपूर झालेला आहे. मुक्तीपूर्व काळात आणि मुक्तीनंतच्या काळात गोमंतक मराठी साहित्यसंमेलन भरविण्यात त्यांनी महत्वपूर्ण कार्य केलेले आहे. हे व्यासपीठ निरंतर वर्धिष्णू कसे होईल याची त्यांनी काळजी वाहिली. 'सागर साहित्य प्रकाशन' ही प्रकाशन संस्था स्थापन करुन गोमंतकातील आणि मराठीच्या मुख्य धारेतील लेखक-कवींची पुस्तके त्यांनी प्रसिद्ध केली. ग्रंथसंस्कृतीची निगुतीने केलेली निगराणी हा देखील त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तीमत्वाचा लक्षणीय पैलू. दादासाहेबांचे विविधांगी कर्तृत्व न्याहाळताना आपण नतमस्तक होतो; पण त्याचबरोबर प्रतिकूल काळात अशा अजोड व्यक्तीमत्वाचा द्रष्टा पुरुष येथे जन्मला याबद्दल अभिमानही वाटतो.

बा. द. उर्फ दादासाहेब सातोस्कर यांचा जन्म माशेल येथे २६ मार्च १९०९ रोजी झाला. माशेल या जन्मगांवी २७ नोव्हेंबर २००० रोजी त्यांचे निधन झाले. शेवटपर्यंत ते लेखनमग्न राहिले. दादासाहेब खरोखर भाग्यवान. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात ते जन्मले आणि शतक संपता संपता त्यांनी या जगाचा निरोप घेतला. त्यांना कृतीशील स्वरुपाचे दीर्घायुष्य लाभले. विसाव्या शतकाचा प्रदीर्घ पट त्यांनी डोळसपणे पाहिला. अनुभवला. आयुष्यात जे जे संकल्प त्यांनी सोडले ते ते पूर्ण करण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यांच्या मुखावर सतत समाधान विलसत असे. १९१० नंतर गोमंतकात प्रबोधनाचा कालखंड सुरु झाला. त्याचे ते साक्षीदार होते. या काळात त्यांच्या जीवनाची जडणघडण झाली. प्रेमळ आईवडिलांचे सखोल संस्कार त्यांच्यावर झाले. 'बादसायन' या आत्मचरित्रात त्याविषयीचे तरंग उमटले आहेत.

माशेल ही पूर्वीची महाशाला... या गावाला आणि पंचक्रोशीला ज्ञान-परंपरा लाभलेली आहे... इथेच अठराव्या शतकात महेश्वरशास्त्री सुखटणकर यांनी 'अमरकोशा' वर 'अमरविवेक' ही टीका लिहिली. रामचंद्र वामन उर्फ फोंडूशास्त्री करंडे हे तर माशेलचे भूषण. विविध पैलू असलेल्या या समृद्ध व्यक्तीमत्वाचा दादासाहेबांवर प्रभाव पडला. रघुनाथ उर्फ बाबा



माशेलकर हे संगीतातले तज्ञ. मास्टर दीनानाथांनी संगीताचे प्राथमिक धडे त्यांच्याकडून घेतले. येथील मंदिराच्या परिसरात मराठी रंगभूमीची निरंतर उपासना चाले. दादासाहेबांचे वडील नाटकात काम करायचे. दादासाहेबांचा बालपणीच नाटकाशी संबंध आला होता.

नाडकर्णी गुरुजींच्या मार्गदर्शनामुळे दादासाहेबांच्या अष्टपैलू व्यक्तीमत्वाची कोनशिला बसविली गेली. म्हापशाचे सारस्वत विद्यालय हे तर त्यांना लाभलेले वरदान होते. काका दणाईतांसारखे सर्वमान्य नेते या विद्यालयाचे चालक होते. ते विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहन देत.

साहित्यक्षेत्रात दिग्गज ठरलेले प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई,

जयवंतराव सरदेसाई व व्यंकटेश पै रायकर आणि शिक्षणक्षेत्रात मौलिक कार्य केलेले मंगेश फोंडू उर्फ लाला सुर्लकर हे त्यांना मित्र म्हणून लाभले. त्यांच्या लाभलेल्या सौहार्दामुळे दादासाहेबांच्या वाङ्मयीन पिंडधर्माचे पोषण झाले. जीवनाच्या वाटचालीत ज्ञानेश्वरीचा नित्यपाठ हा त्यांना निरंतर उर्जा पुरविणारा घटक ठरला. रघुवीर चिमुलकर, दीनानाथ दलाल आणि रघुवीर मुळगांवकर या चित्रकारांचा सहवास दादासाहेबांना लाभला. चित्रकला ही त्यांच्या जीवनातील मर्मबंध आहे असे त्यांनी चित्रकलेविषयी ममत्वाने केलेल्या लेखनातून जाणवते. गानतपस्विनी अंजनीबाई मालपेकर यांच्याविषयी त्यांनी आत्मियतेने आणि जाणकारीने लिहिले आहे.

अशा वाङ्मयीन आणि सांस्कृतिक पुनरुत्थानाचे अध्वर्यू डॉ. पुरुषोत्तम वा. शिरगांवकर यांनी इ. स. १९११ मध्ये पणजीत 'प्रभात ' हे साप्ताहिक सुरु केले. ते अकाली कालवश झाले. त्यांची कायम स्मृती राहावी म्हणून त्यांच्या शिष्यांनी ' प्रभात ' साप्ताहिकाचे मासिकात रुपांतर केले. संपादक होते जनार्दन नारायण पै अस्नोडकर. हे दादासाहेबांचे मामा. त्यांच्या सांगण्यानुसार दादासाहेबांनी 'प्रभात' च्या संपादनाची जबाबदारी स्वीकारली. त्यावेळी ते मुंबईत सेंट झेवियर कॉलेजमध्ये मराठी विषय घेऊन बी. ए. च्या वर्गात शिकत होते. वा. रा. ढवळे हे त्यांचे वर्गमित्र होते. १९३४ ते १९३८ या पाच वर्षात हे काम दादासाहेबांनी उत्साहाने केले. त्यांच्या संपादकीय आणि वाङ्मयीन कर्तृत्वाचा तो प्रारंभबिंदू होता.

दादासाहेब सातोस्करांच्या स्वतंत्र लेखनाचा परामर्श घेण्यापूर्वी त्यांच्या लेखन-गंगोत्रीकडे आवर्जून लक्ष वेधावे असे वाटते. पर्ल बक यांची ' गुड अर्थ ' ही कादंबरी त्यांनी वाचायला घेतली. या कादंबरीने त्यांना भावमंत्रित केले. चीनमधील समाजजीवनावर आधारलेली ही कादंबरी. या कादंबरीतील आशय अनुभवल्यानंतर त्यांना चीनमधील समाजजीवन आणि आपल्याकडील समाजजीवन यांच्यामध्ये मूलत: साम्य आढळले. या वर्ण्य विषयातील वैश्विकता त्यांना जाणवली तो सुवर्णक्षण ! कादंबरीचा अनुवाद त्यांनी केला. पण शीर्षक छळत राहिले. ' गुड अर्थ ' चे भाषांतर ' चांगली जमीन ' का? छे ! अर्थ म्हणजे 'धरित्री' त्यांनी कादंबरीला नांव दिले ' धरित्री '! येथून स्वतंत्र लेखनाचे बीजांकुर त्यांच्या मनोभूमीत रुजले. क्रमाक्रमाने प्रज्ञा, प्रतिभा आणि परिश्रम या गुणत्रयींचा संगम त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तीमत्वात होत गेला. वि. स. सुखटणकर यांच्या 'सह्याद्रीच्या पायथ्याशी ' या काव्यसंग्रहातून प्रेरणा घेऊन 'कुलागार' हा बारा कथाकारांच्या प्रादेशिक कथांचा संग्रह १९३७ मध्ये संपादित केला.

गोव्यातील प्रादेशिक वातावरणाची पार्श्वभूमी असलेली ' जाई ' ही दादासाहेबांची लक्षणीय कादंबरी. बदलत्या समाजातील स्त्री-पुरुष नातेसंबंधाचे चित्रण या कादंबरीत त्यांनी केलेले आहे. प्रेमभावनेचा प्रगल्भ आविष्कार ' जाई ' मध्ये आढळतो.

चित्रकला, संगीत आणि नाटक या जीवनाला समृद्ध करणाऱ्या कलांचा दादासाहेबांनी समरसून अभ्यास केलेला होता. त्यांच्या या अभ्यासाचे आणि रसज्ञतेचे फलित म्हणजे ' मेनका ' आणि ' अनुपा ' या कादंबऱ्या. ' मेनका ' या कादंबरीत एका गानतपस्विनीचे आणि मनस्विनीचे चित्रण त्यांनी तन्मयतेने केलेले आहे. तिच्या भावजीवनातील चढउतार आणि संगीतकलेत नैपुण्य मिळविण्यासाठी तिने केलेल्या खडतर साधनेचा आलेख त्यात रेखाटलेला आहे. सामाजिक विषमतेमुळे अभंग जिद्दीने कला आत्मसात करणाऱ्या संवेदनशील कलावंतांच्या मनाची होरपळ कशी होते, तिचा करुण पट येथे लेखकाने रंगविला आहे.

' अनुपा ' ही चित्रकाराच्या जीवनावर आधारलेली कादंबरी. आधुनिक जीवनप्रणालीत मूल्यांचा ऱ्हास कसा होत चाललेला आहे त्याचे प्रातिनिधीक चित्रण या चित्रकाराच्या व्यक्तीरेखेद्वारा लेखकाने केलेले आहे. आपल्या कलेवर निरपेक्ष भावनेने प्रेम करणाऱ्या अनुपाला तो चित्रकार कसा फसवतो या कथासूत्राभोवती ही कादंबरी गुंफलेली आहे. तिच्यातील वास्तव चित्रण अंतर्मुख करणारे आहे.

' आज मुक्त चांदणे ' ही गोमंतकाच्या मुक्तीसंग्रामावर आधारलेली दोन भागांत प्रसिद्ध झालेली कादंबरी. इ. स. १९४६ मध्ये डॉ. राममनोहर लोहिया यांनी या लढ्याचे रणशिंग फुंकले. तेथून मुक्तीसंग्रामाने उग्र स्वरुप धारण केले. इ. स. १९६१ साली गोमंतकाच्या मुक्तीची महन्मंगल पहाट उजाडली.

१९४६ ते १९६१ हा कालखंड, त्यातील महत्वपूर्ण घटना आणि त्यात गुंतलेल्या माणसांच्या मनातील आंदोलने यांचे प्रभावी चित्रण लेखकाने केलेले आहे. या कादंबरीचा नायक विश्वनाथ हा संवेदनशील व काव्यात्म वृत्ताचा तरुण आहे. तो कृतीशील आहे. निसर्गसौदर्याचा मुक्त मनाने आस्वाद घेणारा रसिक आहे. त्याच्या वृत्तीशी भिन्न असणारी सदानंद ही व्यक्तीरेखा कृतीपेक्षा लेखणीवर भिस्त ठेवणारी आहे. या दोन प्रवृत्ती तत्कालीन गोमंतकात वावरत होत्या. याचे भान लेखकाने ठेवलेले आहे. विश्वनाथने केलेल्या साहसाच्या कृत्यांचे वर्णन येथे आहे. आजेंतु मोंतेरो या क्रूर व्यक्तीने स्वातंत्र्यसैनिकांच्या केलेल्या निर्घृण छळांचे चित्रण येथे आढळते. तत्कालीन राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ येथे उलगडले जातात आणि वाचकांचे मन नजीकच्या भूतकाळात प्रवेश करते. गोमंतकाच्या पारतंत्र्यामुळे सर्व क्षेत्रांत काळोखाचे साम्राज्य पसरले होते. आणि मुक्तीमुळे मुक्त चांदणे कसे खुलले हे दादासाहेबांनी समरस होऊन रेखाटले आहे. ते स्वत: मुक्तीसंग्रामाशी निगडीत असल्यामुळे आणि अनेक घटनांचे साक्षीदार असल्यामुळे वास्तवाचे त्यांनी सतत भान ठेवले आहे.

रामायण आणि महाभारत हे दादासाहेबांच्या अखंड चिंतनाचे विषय. भारतीय जीवनदृष्टी घडविणारी ही दोन श्रेष्ठ महाकाव्ये. कादंबरीच्या रुपबंधात आपल्या चिंतनशील प्रतिभेचा आविष्कार दादासाहेबांना परिणतप्रज्ञ वयात करावासा वाटला. अथक प्रयत्नांनी त्यांनी रामायण-महाभारतातील व्यक्तीरेखांवर नवा प्रकाश टाकला. श्रीरामाच्या जीवनावर त्यांनी ' अभिराम ' ही कादंबरी लिहिली. श्रीकृष्णाच्या जीवनावर ' वासुदेव ' ही कादंबरी लिहिली. पर्ल बकच्या ' मदर ' या कादंबरीचा ' आई ' हा अनुवाद त्यांनी केला. चार्ल्स डिकन्सच्या ' ऑलिव्हर ट्विस्ट ' चा ' दिग्या ' हा अनुवाद त्यांनी केला.

दादासाहेबांनी कथालेखनही केलेले आहे. 'प्रीतीची रीत' आणि ' अभुक्ता ' हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. 'द्राक्षांचे घोस ' आणि ' पंचविशीतले पाप ' हे त्यांचे अनुवादित कथासंग्रह.

त्यांच्या कथा या प्रामुख्याने मध्यवर्गीय कुटुंबजीवनाचे चित्रण करणाऱ्या आहेत. माणसा-माणसांमधले नातेसंबंध ते उलगडून दाखवितात. मराठीच्या मुख्य धारेतील कथेच्या वळणापासून त्या अलिप्त आहेत. प्रयोगशीलता आणण्याचा अट्टाहास त्यांतून दिसून येत नाही. ' अभुक्ता ' मधील कथात प्रादेशिकतेची पार्श्वभूमी आहे. पात्रे गोमंतकातील आहेत. समकालीन गोमंतकीय कथाकारांचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला नाही. कथालेखनाला त्यांनी वाहून घेतलेले नाही अथवा विपुल कथालेखन केले नाही.

' उदंड जाहले पाणी ' हे एकमेव नाटक दादासाहेबांनी लिहिले. मगध साम्राज्यात माजलेली बेबंदशाही, चाणक्याच्या मदतीने चंद्रगुप्त मौर्याने केलेली राजक्रांती हे आशयसूत्र घेऊन त्यांनी हे ऐतिहासिक नाटक लिहिले. त्यातून त्यांचा इतिहासाचा व्यासंग आणि संशोधनात्मक दृष्टी प्रकट होते.

' शांग्रीला ' हा त्यांचा एकमेव ललितनिबंधसंग्रह. लालित्याच्या दर्व छटांचे या पुस्तकात दर्शन घडते. निसर्गानुभूती आणि आत्मनिष्ठ वृत्ती यांचा स्वरसंगम या पुस्तकात उत्तम रीतीने साधलेला आहे. निसर्गाचे त्यांना अतिशय आकर्षण. सागराविषयी अत्यंत प्रेम. तरल संवेदनशीलतेने त्यांनी आपल्या 'स्वप्नगंध ' या वास्तूच्या गच्चीवरुन दिसणाऱ्या समुद्राचे रमणीय सूर्यास्ताचे चित्रमय वर्णन केलेले आहे. 'मांडवी आणि जुवारीच्या काठावर ' हा संस्मरणात्मक लेख तर अप्रतिम आहे. पाऊणशे वर्षापूर्वीच्या जुन्या वातावरणात तो आपल्याला घेऊन जातो. इतिहासाच्या अभ्यासकाची दादासाहेबांची जी बैठक आहे ती येथे दृग्गोचर होते. वृक्षवल्लरींविषयी त्यांना नितांत ममत्व वाटते. वास्तविक हे सारे विस्ताराने सांगायला हवे. ' गांवातल्या कुंपणाच्या एखाद्या कोपऱ्यावर पांगारा फुलतो तेव्हा मंदिरासमोरच्या प्रज्वलित दीपमाळेची आवठण होते. ' किंवा ' संध्याकाळच्या वेळी मांडवी नदीतून येणारा खारा वारा सुरुच्या बनात घुसू लागेल तेव्हा सनईचे सूर घुमल्यासारखे वाटेल. ' हे वाचताना रसिकमन ताजेतवाने होते. निसर्गाविषयीचे लेखकाचे मैत्र अनुभवल्यानंतर आपणास आल्हाद वाटतो. या लेखसंग्रहातील विषयांची विविधता पाहून लेखकाच्या अनुभवविश्वाची कल्पना येते. त्याच्या वृत्तिगांभिर्याबरोबर नर्मविनोदी स्वभावाची झलक येथे पहावयास मिळते.

सृजनशील साहित्यनिर्मितीबरोबरच दादासाहेब सातोस्करांनी समीक्षात्मक आणि संशोधनात्मक लेखन केले. ते तोलामोलाचे ठरले आहे. 'गोमंतकीय मराठी साहित्याचे शिल्पकार' आणि 'गोमंतकीय मराठी साहित्याचे आधुनिक शिल्पकार' या समीक्षात्मक ग्रंथामधून गोमंतकातील मराठी परंपरेची निरलसपणे सेवा करणाऱ्या वाङ्मयोपासकांचा आणि त्यांच्या विविधांगी वाङ्मयसंपदेचा त्यांनी चिकित्सक वृत्तीने परामर्श घेतलेला आहे. गोमंतभूमीविषयीचे ममत्व आणि मराठी वाङ्मयाविषयीची नि:सीम निष्ठा हा दादासाहेबांचा स्थायीभाव आहे. वाङ्मयाच्या इतिहासाला पूरक ठरणारे हे महत्वपूर्ण संदर्भ ग्रंथ आहेत. कृष्णदास शामा, विठ्ठल नृसिंह नाईक केरीकर, गो. ना. माडगांवकर, माधव चंद्रोबा डुकले व अनंत चंद्रोबा डुकले, सूर्याजी सदाशिव महात्मे, कृष्णंभट बांदकर, पंडित धर्मानंद कोसंबी, शणै गोनयबाब, विं. का. प्रियोळकर, डॉ. पांडुरंग स. पिसुर्लेकर, प्रा. अ. का. प्रियोळकर, ना. भा. नायक, रा. ना. वेलिंगकर, वि. स. सुखटणकर, प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई, कविवर्य बा. भ. बोरकर, पंडित महादेवशास्त्री जोशी, नारायण केशव शिरोडकर, चंद्रकांत शिरोडकर, प्रा. मनोहर हिरबा सरदेसाई, नारायण देसाई, शांताराम पांडुरंग केणी, प्रा. स. शं. देसाई, डॉ. वि. बा. प्रभूदेसाई, सुधाकर प्रभू, ना. र. धारगळकर, ज्योत्स्ना भोळे, गणाधीश खांडेपारकर आणि डॉ. सुभाष भेण्डे यांच्या व्यक्तीमत्वाचा आणि वाङ्मयाचा वेध दादासाहेबांनी घेतलेला आहे. या नावांवर दृष्टीक्षेप टाकला की सोळाव्या शतकापासून विसाव्या शतकापर्यंतच्या साहित्यातील तसेच समीक्षा-संशोधनक्षेत्रातील मानदंडाविषयीचे हे विवेचन आहे, लक्षात येते. यावरुन दादासाहेबांच्या प्रज्ञेचा पल्ला किती व्यापक आहे हे ध्यानात येते.

'मराठी मासिकांचे पहिले शतक' हे दादासाहेबांचे छोटेखानी पुस्तक असले तरी तो माहितीपूर्ण आणि मौलिक दस्तऐवज आहे. एकोणिसाव्या शतकातील प्रबोधनयुगाला ज्या नियतकालिकांनी चैतन्य प्राप्त करुन दिले, त्यांच्या कार्याचा येथे दादासाहेबांनी साक्षेपाने परामर्श घेतलेला आहे.

दादासाहेब सातोस्कर यांनी लिहिलेला 'गोमंतक : प्रकृती आणि संस्कृती' हा त्रिखंडात्मक बृहद्ग्रंथ म्हणजे त्यांच्या संशोधनकार्याचा कळसाध्याय आहे. गोव्याचा प्राचीन इतिहास, येथील समाजजीवनाची जडण-घडण, सांस्कृतिक परंपरा, भाषा, मौखिक परंपरा आणि विविध कला अशा अनेक पैलूंची साक्षेपी नोंद करणारा आणि त्यांतून आपल्या राष्ट्रीय परंपरेशी असणारे अंत:सूत्र अधोरेखीत करणारा संशोधक आणि प्रज्ञावंत म्हणून दादासाहेब सातोस्कर यांची तेजस्वी प्रतिमा साकार होते. इतिहास, संस्कृतीशोध, समाजशास्त्र आणि मानव-वंशशास्त्र या ज्ञानशाखांची मिती या अभ्यासाला प्राप्त झालेली आहे. ज्या वयात दादासाहेब या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी बैठक मारुन सिद्ध झाले, ते पाहता मती कुंठीत होते. अखंडित ज्ञानयज्ञ हे त्यांच्या जीवनाचे सूत्र आहे. त्यांनी मांडलेल्या विचारांशी मतभिन्नता असू शकेल; पण उतारवयात व्यासंग करुन नव्या पिढीसमोर त्यांनी हा दस्तऐवज ठेवलेला आहे. तो अभ्यासकांना चालना देणारा आहे. विधायक कार्य करायला प्रेरणा देणारा आहे. गोमंतकाची परंपरा समजून घेण्यासाठी तो लक्षणीय, संदर्भग्रंथ ठरणारा आहे. त्यांच्या दुसऱ्या खंडाला 'केसरी-मराठा ट्रस्ट' चा 'न. चिं. केळकर पुरस्कार' लाभला. मराठीच्या मुख्य प्रवाहाने त्यांच्या कार्याची योग्य ती दखल घेतली असा त्याचा अर्थ.

दादासाहेबांनी 'श्रद्धांजली' आणि 'स्मरण' हे व्यक्तीपर लेख लिहिले आहेत. महात्मा गांधींच्या मृत्यूनंतर राष्ट्रीय नेत्यांनी त्यांना वाहिलेली श्रद्धांजली आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील व्यक्तींनी या शोकात्म प्रसंगानंतर व्यक्त केलेली प्रतिक्रिया 'श्रद्धांजली' या पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहे.

'स्मरण' हा मृत्यूलेखांचा संग्रह. 'स्मरण ज्येष्ठांचे' आणि 'स्मरण स्नेह्यांचे' अशा दोन भागांत तो विभागलेला आहे. दादासाहेबांचे व्यक्तीमत्व संपन्न करण्यात या सर्वांचा महत्वपूर्ण वाटा आहे. अर्थात लेखकाचा त्यांच्याविषयीचा कृतज्ञताभाव या पुस्तकांत ओथंबून आलेला आहे. त्यामुळे या लेखनाला आत्मनिष्ठ स्वरुप प्राप्त झाले आहे. ज्या व्यक्तींचे भावस्मरण लेखकाने केलेले आहे त्या विविध क्षेत्रांतील आहेत. या 'स्मरणसाखळी' मधून नकळत न लिहिलेले आत्मचरित्र साकार होते. ही संस्मरणे हृद्य आहेत. ज्येष्ठ व्यक्तींमध्ये 'नाडकर्णी गुरुजी', 'माझे तीर्थरुप', 'माझे डॉ. बाप्पा', 'प्रा. फांसीश्कु आब्रेव', 'डॉक्टर मामा

व्यं. पां. कामत', 'काका दणाईत व सिनारी गुरुजी', 'गानतपस्विनी अंजनीबाई मालपेकर' आणि 'समाजसुधारक सुदामजी मांद्रेकर' यांचा समावेश आहे. दुसऱ्या भागात स्नेह्यांचा समावेश केलेला आहे. त्यात 'सर्वो', 'लाला सुर्लकर', 'चित्रकार रघुवीर चिमुलकर', 'वा. वी. भट', 'चित्रकार दीनानाथ दलाल', 'शंकरराव कुलकर्णी' 'केशवराव कोटावळे', 'चित्रकार रघुवीर मुळगांवकर', 'लक्ष्मीकांत भेंब्रे' आणि 'भाऊसाहेब बांदोडकर' आहेत.

या लेखांमधून लेखकाचा अंतरीचा जिव्हाळा व्यक्त झालेला आहे; शिवाय त्या कालाचा पट आपल्या डोळ्यांसमोरुन तरळून जातो.

आयुष्याच्या संध्याकाळी ४५१ पृष्ठांचे 'बासदायन' हे आत्मचरित्र त्यांनी लिहिले. गोष्टीवेल्हाळ वृत्तीने लिहिलेले वाचनीय आत्मचरित्र म्हणून त्याचा उल्लेख करावा लागेल. या वर्णशैलीत प्रांजळ वृत्ती आणि पारदर्शित्व आहे. 'पूर्वायन', 'मध्यायन' व 'उत्तरायण' अशा तीन कालखंडात हे आत्मचरित्र विभागलेले आहे. यात दादासाहेबांच्या व्यक्तीमत्वाच्या जडणघडणीचा आलेख चिरस्मरणीय झालेला आहे. त्यातील तपशील न नोंदता मुळातून आस्वाद घ्यावा असे हे आत्मचरित्र आहे. 'बासदायन' आणि पंडित महादेवशास्त्री जोशी यांचे 'आत्मपुराण' या दोन आत्मचरित्रांतून गोमंतकातील मुक्तीपूर्व आणि मुक्तीनंतरचे जीवन चैतन्यशील वृत्तीने आणि आत्मीयतेने रेखाटलेले आहे असे निरीक्षण नोंदवावेसे वाटते. या दोघांमधील सौहार्दही अजोड स्वरुपाचे होते.

दादासाहेब सातोस्कर यांना निसर्गाविषयी अत्यंत ममत्व वाटत असे. विशाल नभ, विशाल सागर, उंच डोंगर-पर्वत त्यांच्या मनाला भुरळ घालीत असत. बालपणातील आल्हाददायी क्षणतरंगांचे चित्रमय वर्णन त्यांनी समरसतेने आणि रसमयतेने केलेले आहे. ते रसिकमनाला आनंदानुभव देणारे आहे. 'बासदायन' मधील 'मांडवीची परिक्रमा' या दृष्टीने अवश्य वाचावी :

"दोन्ही तीरावरची झाडे नदीवर वाकली होती आणि त्यांनी एक लतामंडप किंवा वृक्षमंडप म्हणू - तयार केला होता. दुपारच्या सूर्यकिरणांचा कवडसादेखील होडीत पडत नव्हता. उलट गारव्याने अंगात हुडहुडी भरली होती"

तरल मनाने रेखाटलेले हे चित्र लेखकाच्या सौंदर्यनिष्ठ मनाचे दर्शन घडविते.

'बासदायन' मध्ये अनेक घटनांची, प्रसंगांची, व्यक्तींच्या सहवासातील क्षणांची चित्रे दादासाहेबांनी रेखाटली आहेत. ते लिहित नसून आपल्याशी सुखसंवाद करीत आहेत असे जाणवते. फार मोठी माणसे आयुष्यात त्यांना भेटली. त्यांनी दादासाहेबांचे जीवन समृद्ध केले. त्यांनी हे विचारधन समाजपुरुषाला मुक्त मनाने दिले. 'संध्याछाया न भिवविति हृदया' अशी त्यांची भावना होती. त्यामुळे 'वानप्रस्थाश्रम' त्यांना कधीही मान्य झाला नाही.

या वाङ्मयनिर्मितीशिवाय अन्यप्रकारची पुस्तके दादासाहेबांनी लिहिली. त्यांचा उल्लेख येथे करणे आवश्यक आहे. 'पत्रविद्या' हा त्यांचा ग्रंथ पत्रकारितेच्या व्यवसायात पदार्पण करणाऱ्याला मार्गदर्शन करणारा आहे. डॉ. शि. रा. रंगनाथन् यांनी रुढ केलेले 'द्विबिंदू वर्गिकरण' नीट समजावून देणारे 'द्विबिंदूवर्गिकरण पद्धती व तिचा मराठी ग्रंथालयात उपयोग' हे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध झालेले आहे. याशिवाय 'ग्रंथ वर्गीकरण : तात्त्विक' हे पुस्तक त्यांनी लिहिले. 'येथे देवांची वसती' हे स्थलवर्णनात्मक पुस्तक त्यांनी लिहिले.

त्यांच्या अखंडित वाङ्मयीन तपस्येचे फल म्हणून मंगेशी येथे भरलेल्या १७ व्या अ. गो. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना प्राप्त झाला. त्यावेळी त्यांनी त्या व्यासपीठावरुन पुढील अनुभवसिद्ध उद्‌गार काढले.

'... भाषा आणि साहित्य यांचे एक अतूट नाते आहे... भाषा म्हणजे शब्दसमुच्चय आणि शब्दांनी जुळवलेली वस्तू म्हणजे साहित्य, हे खरे असले तरी शब्दांमागे लेखकाची सच्ची अनुभूती असायला हवी. ती नसली तर अस्सल सर्जनशील साहित्य निर्माण होणे कठीण.'

-गोमंतकातील या श्रेष्ठ वाङ्मयोपासकाला त्यांच्या जन्मशताब्दीच्या क्षणी विनम्र अभिवादन ! ✻